आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in गुरुवार दिनांक 01/10/2026 METRO CITY VRUTANT

> संपादक : रफी हुसेन > पिंपरी चिंचवड व पुणे > पान 4 > अंक 207 > RNI - MAHMAR /2021/51239 > metrocity924@gmail.com

# 2 ऑक्टोबरला सीजेपीचे मुंबईत आंदोलन!

## निवडणूक आयोगातील कथित मतभेदांच्या पार्श्वभूमीवर आंदोलनाची घोषणा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : केंद्रीय निवडणूक आयोगातील कथित अंतर्गत मतभेदांच्या पार्श्वभूमीवर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागली आहे. दोन निवडणूक आयुक्तांनी काही निर्णयांबाबत आक्षेप नोंदवल्याच्या वृत्तानंतर विरोधी पक्षांकडूनही या मुद्द्यावर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. दरम्यान, कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी 2 ऑक्टोबरपासून देशव्यापी आंदोलनाची घोषणा केली आहे.**



या आंदोलनाची सुरुवात मुंबईतून करण्यात येणार असून, 2 ऑक्टोबर रोजी मुंबईतील शिवाजी पार्क येथेच आंदोलन होणार असल्याचे सीजेपीकडून स्पष्ट करण्यात आले आहे. आंदोलनाबाबत सोशल मीडियावर विविध संदेश फिरत असल्याने सीजेपीकडून स्पष्टीकरण देण्यात आले आहे. आशुतोष रांका यांनी केलेल्या पोस्टनुसार, 2 ऑक्टोबरचे आंदोलन केवळ शिवाजी पार्क येथे होणार असून, आगामी काळात अन्य शहरांमध्येही आंदोलन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.दरम्यान, या आंदोलनाला पोलिसांकडून परवानगी नाकारण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे नियोजित आंदोलनाबाबत काही काळ संभ्रम निर्माण झाला होता. मात्र, सीजेपीने आंदोलनाचे ठिकाण आणि कार्यक्रमाबाबत आपली भूमिका कायम ठेवली आहे. आज, 30 सप्टेंबर रोजी शिवाजी पार्क परिसरात सीजेपीच्या कार्यकर्त्यांना आंदोलनाच्या तयारीवरून विरोध करणाऱ्या एका गटासोबत वाद झाल्याचेही वृत्त आहे.

निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी गेल्या काही महिन्यांत काही निर्णयांबाबत आक्षेप नोंदवल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. या वृत्तानंतर मुख्य निवडणूक आयुक्तांच्या कार्यपद्धतीवर विरोधकांकडून प्रश्न उपस्थित करण्यात आले आणि त्यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली.मात्र, निवडणूक आयोगाने हे आरोप फेटाळले आहेत. आयोगाने 26 सप्टेंबर रोजी स्पष्ट केले की, एसआयआरशी संबंधित आदेश आणि वेळापत्रकाला तिन्ही सदस्यांची एकमताने मंजुरी होती. तसेच दोन निवडणूक आयुक्तांनी केंद्रीय मंत्रिमंडळ सचिवांना पाठवलेले पत्र हे आयोगाच्या धोरणात्मक निर्णयांशी संबंधित नसून एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या कामकाजासंदर्भात असल्याचे आयोगाने स्पष्ट केले.या वादाच्या पार्श्वभूमीवर मुख्य निवडणूक आयुक्तांच्या कार्यपद्धतीविरोधात सर्वोच्च न्यायालयातही याचिका दाखल झाली असून, न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी घेण्याचे मान्य केले आहे.

अभिजीत दिपके यांनी यापूर्वीच ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा न दिल्यास 2 ऑक्टोबरपासून आंदोलन सुरु करण्याचा इशारा दिला होता. मुंबईतून सुरुवात करून हे आंदोलन देशातील विविध शहरांमध्ये नेण्याची घोषणा त्यांनी केली आहे.

त्यामुळे आता 2 ऑक्टोबरला शिवाजी पार्कवर सीजेपीचे आंदोलन कशा पद्धतीने होते आणि प्रशासनाची भूमिका काय राहते, याकडे राजकीय तसेच सामाजिक क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# मोशी दुर्घटनेतील निलंबित अधिकाऱ्यांकडून दोषारोप अमान्य

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड : मोशी कचरा डेपो दुर्घटनेप्रकरणी निलंबित करण्यात आलेल्या महापालिकेच्या तीन अधिकाऱ्यांनी प्रशासनाने ठेवलेले दोषारोप अमान्य केले आहेत. त्यामुळे आता मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट आणि अग्निशामक विभागाचे अधिकारी ऋषिकांत चिपाडे यांच्याविरोधात विभागीय चौकशी सुरु करण्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे सादर केला आहे. आयुक्तांच्या मान्यतेनंतर या चौकशीला सुरुवात होणार आहे.**




पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशी कचरा डेपोतील 'वेस्ट-टू-एनर्जी' प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर 8 जुलै रोजी कचऱ्याचा डोंगर कोसळला होता. या दुर्घटनेत नऊ कामगारांचा मृत्यू झाला, तर 12 जण जखमी झाले होते. या घटनेनंतर कंत्राटदार कंपनीच्या दोन अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. त्याचबरोबर महापालिका प्रशासनाने आपल्या तीन अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली होती.महापालिका पातळीवर करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीत संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबत प्रथमदर्शनी आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. कर्तव्यात गंभीर निष्काळजीपणा, शासकीय कामकाजात हलगर्जीपणा, अधिकारांचा गैरवापर करून अनधिकृत बांधकामाला अभय देणे आणि पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन केल्याचे निरीक्षण प्रशासनाच्या चौकशीत नोंदविण्यात आल्याचे सांगण्यात आले.निलंबनानंतर सामान्य प्रशासन विभागाने तिन्ही अधिकाऱ्यांना दोषारोपपत्र बजावले होते. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांनी हे दोषारोप मान्य केले नाहीत. त्यामुळे आता त्यांच्या भूमिकेची सविस्तर तपासणी विभागीय चौकशीच्या माध्यमातून केली जाणार आहे.विभागीय चौकशीदरम्यान संबंधित अधिकाऱ्यांची बाजू, प्रशासनाने केलेले आरोप, उपलब्ध कागदपत्रे, तांत्रिक बाबी आणि दुर्घटनेशी संबंधित परिस्थिती यांची तपासणी केली जाणार आहे. ही प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी किमान सहा महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

चौकशीत संबंधित अधिकाऱ्यांवरील आरोप सिद्ध होतात की नाही, यावर पुढील प्रशासकीय कारवाई अवलंबून राहणार आहे. त्यामुळे या चौकशीच्या निष्कर्षाकडे आता महापालिका वर्तुळाचे लक्ष लागले आहे. दरम्यान, मोशी कचरा डेपो दुर्घटनेची सखोल आणि तांत्रिक चौकशी करण्यासाठी राज्य शासनाने विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती नियुक्त केली होती.

या समितीने घटनास्थळाची पाहणी करून महापालिका अधिकारी, कंत्राटदार कंपनीचे प्रतिनिधी, तांत्रिक तज्ञ तसेच प्रत्यक्षदर्शी कर्मचाऱ्यांचे जबाब नोंदविले.

याशिवाय प्रकल्पाची मंजुरी, सुरक्षा परवानग्या, संरचनात्मक आराखडे आणि देखभाल नोंदींचीही तपासणी करण्यात आली.

# ‘सेवा संकल्प’मधून आश्रमशाळांमध्ये ज्ञान, आरोग्य अन् पर्यावरणाचा जागर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासोबतच त्यांच्या शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि सामाजिक जाणिवांना चालना देण्यासाठी सेवा संकल्प अभियानांतर्गत जुन्नर तालुक्यातील विविध शासकीय आश्रमशाळांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.**



शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, मुथाळणे येथे विद्यार्थ्यांना नर्सिंग व्यवसाय व त्यातील करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. नर्सिंग क्षेत्रातील शैक्षणिक संधी, आवश्यक कौशल्ये तसेच या क्षेत्रातील रोजगाराच्या विविध वाटांबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

जुन्नर आश्रमशाळेत वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देत वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन करण्यात आले. आंबे आश्रमशाळा येथे विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती निर्माण करण्याबरोबरच सामान्य ज्ञान, तर्कशक्ती आणि अभ्यासाची सवय विकसित करण्याच्या उद्देशाने या परीक्षेचे आयोजन करण्यात आले.

शासकीय कन्या आश्रमशाळा, सोमतवाडी येथे ॲनिमिया तसेच मासिक पाळीविषयीचे समज-गैरसमज या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. किशोरवयीन मुलींमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्यासाठी या मार्गदर्शनाचा विद्यार्थिनींना लाभ झाला.

वडेश्वर आश्रमशाळेत सेवा संकल्प अभियानांतर्गत निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना विविध विषयांवर विचार मांडण्याची संधी देत त्यांच्या लेखनकौशल्याला आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यात आले.

या विविध उपक्रमांमधून विद्यार्थ्यांच्या शिक्षणासोबतच आरोग्य, पर्यावरण, स्पर्धात्मकता, व्यक्तिमत्त्व विकास आणि सामाजिक जाणीव यांना बळकटी देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये शासकीय ‘एमबीबीएस’ महाविद्यालय सुरु करा!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आमदार महेश लांडगे यांचे पत्र

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**शहरात शासकीय अथवा महापालिकेचे एमबीबीएस महाविद्यालय सुरु करण्याची मागणी आमदार महेश लांडगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. वायसीएम रुग्णालयाशी संलग्न महाविद्यालयाला तत्वतः मान्यता देऊन त्यासाठी जागा, निधी आणि मनुष्यबळाचा सविस्तर प्रस्ताव निश्चित मुदतीत मागवावा, असे साकडे त्यांनी घातले आहे.**




पिंपरी-चिंचवडची लोकसंख्या सुमारे 40 लाखांपर्यंत पोहोचली असताना शहरात सरकारी किंवा महापालिकेचे एमबीबीएस महाविद्यालय नसल्याचा मुद्दा लांडगे यांनी उपस्थित केला आहे. वायसीएम रुग्णालयाशी संलग्न संस्थेत एमडी आणि एमएस पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु आहेत; मात्र एमबीबीएससाठी स्थानिक विद्यार्थ्यांना पुणे, इतर जिल्हे किंवा खासगी संस्थांकडे जावे लागते, असे पत्रात नमूद आहे.खासगी वैद्यकीय शिक्षणाचा वाढता खर्च मध्यमवर्गीय कुटुंबांना पेलणे कठीण होत असल्याचे लांडगे यांनी म्हटले आहे. पत्रात दिलेल्या अंदाजानुसार, काही खासगी संस्थांमध्ये साडेचार वर्षांचे शिक्षण शुल्क, निवास आणि इतर शुल्क मिळून एमबीबीएसचा खर्च सुमारे ₹1.48 कोटी होऊ शकतो. हा सर्व महाविद्यालयांना लागू असलेला दर नसून पत्रातील खर्चाचा अंदाज आहे. राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या निर्देशानुसार एमबीबीएसचे शिक्षण शुल्क साडेचार वर्षांच्या शैक्षणिक कालावधीपुरतेच आकारायचे आहे.महाविद्यालयासाठी महापालिकेचा ठोस प्रस्ताव अद्याप तयार झालेला नसल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून मिळाल्याचेही लांडगे यांनी पत्रात म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, नगरविकास विभाग आणि पिंपरी-चिंचवड महापालिका यांची संयुक्त बैठक बोलवावी, अशी त्यांची मागणी आहे. जागा, आर्थिक तरतूद, आवश्यक मनुष्यबळ आणि राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या निकषांचा समावेश असलेला प्रस्ताव प्रशासनाने निश्चित कालमर्यादेत सादर करावा; त्यानंतर राज्य शासनाने मान्यता व निधीबाबत निर्णय घ्यावा, असेही त्यांनी सुचवले आहे.

गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांतील गुणवंत विद्यार्थ्यांना परवडणारे वैद्यकीय शिक्षण उपलब्ध व्हावे आणि शहराच्या वाढत्या आरोग्यसेवेसाठी डॉक्टर घडावेत, यासाठी मुख्यमंत्र्यांनी या विषयात वैयक्तिक लक्ष घालावे, अशी विनंती लांडगे यांनी केली आहे.

# सफाई मित्र सुरक्षा शिबिर संपन्न

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : शहराच्या स्वच्छतेची धुरा सांभाळणाऱ्या सफाई सेवकांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेला प्राधान्य देत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा 2026' अभियानांतर्गत सफाई मित्र सुरक्षा शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. 28 आणि 30 सप्टेंबर रोजी झालेल्या या शिबिरांमध्ये अ, ब, क, ड, इ, फ, ग, ह, ज आणि ल या दहाही क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रातील आतापर्यंत 3,500 हून अधिक सफाई सेवकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. थेरगाव येथील स्व. कै. शंकरराव गावडे कामगार भवन येथेही शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**




**3,500 हून अधिक सफाई सेवकांची करण्यात आली तपासणी**

या शिबिरांमध्ये हिमोग्लोबिन, रक्तदाब, मधुमेह आदींची मोफत तपासणी करण्यात आली. तसेच संतुलित आहार, नियमित व्यायाम, योगासने, प्राणायाम, ताणतणावाचे व्यवस्थापन आणि नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कामाच्या स्वरूपानुसार आवश्यक सुरक्षा साधनांचा वापर करणे, आरोग्यविषयक चांगल्या सवयी अंगीकारणे आणि आजाराची प्राथमिक लक्षणे दिसून आल्यास वेळीच वैद्यकीय सल्ला घेण्याबाबतही सफाई सेवकांना मार्गदर्शन करण्यात आले.

"सफाई सेवक हे शहराच्या स्वच्छतेतील महत्त्वाचे घटक आहेत. कामाच्या स्वरूपानुसार आवश्यक सुरक्षा साधनांचा वापर करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आरोग्याची नियमित तपासणी करून योग्य ती काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आरोग्यविषयक समस्या सुरुवातीच्या टप्प्यातच लक्षात आल्यास त्यावर वेळेत उपाययोजना करता येतात. त्यामुळे सफाई मित्रांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देण्यात येत आहे," असे उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी यावेळी सांगितले.कचरा वेचकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत डॉ. ठेंगल यांच्या हस्ते सुरक्षा साधनांचे वाटप देखील यावेळी करण्यात आले. शिबिराच्या माध्यमातून समाज विकास विभागाच्या महिला व बालकल्याण योजनांचीही माहिती देण्यात आली. महिला बचतगट, विधवा व घटस्फोटित महिलांसाठी स्वयंरोजगार, कौशल्य व व्यवसाय प्रशिक्षण तसेच महिलांसाठी विविध आर्थिक सहाय्य योजनांची माहिती देऊन पात्र महिलांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले."महिला व बालकल्याण विभागाच्या विविध योजनांचा लाभ गरजू आणि पात्र महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. आर्थिक सहाय्य, कौशल्य प्रशिक्षण आणि स्वयंरोजगाराच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्याचा या योजनांचा उद्देश आहे. या योजनांचा लाभ गरजू महिलांपर्यंत पोहोचल्यास त्यांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणास मदत होईल," असेही डॉ. प्रदीप ठेंगल यांनी यावेळी नमूद केले.या शिबिरास डॉ. शिवाजी ढगे, डॉ. शंकर मोसलगी, डॉ. कुलभूषण कुलकर्णी, डॉ. तुषार जाधव, सहायक आरोग्य अधिकारी श्रीराम गायकवाड, राजेश भाट, अंकुश झिटे, अतुल सोनवणे, कांचनकुमार इंदलकर, योगेश फल्ले तसेच आरोग्य निरीक्षक, संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि सफाई सेवक उपस्थित होते.

# लग्नास नकार दिल्याने प्रेयसीवर चाकूहल्ला

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड : लग्नास नकार दिल्याच्या रागातून प्रियकराने प्रेयसीवर धारदार चाकूने सपासप वार करून तिला जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना हिंजवडी येथे सोमवारी (29 सप्टेंबर) पहाटे साडेपाचच्या सुमारास घडली. हल्ल्यानंतर आरोपीने स्वतः उंदीर मारण्याचे विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. जखमी तरुणीवर उपचार सुरू असून, आरोपीवरही खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.**



याप्रकरणी 24 वर्षीय पीडित तरुणीने हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी प्रियकराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी तरुणी हिंजवडी परिसरातील एका खासगी कंपनीत काम करते. गेल्या सुमारे एक वर्षापासून तिचे आरोपीसोबत प्रेमसंबंध होते. सोमवारी पहाटे तरुणी आपल्या बहिणीसोबत कामावर जात असताना आरोपीने तिला रस्त्यात अडवले.

"तुझ्यामुळे मला कामावरून काढून टाकले आहे. तू माझ्याशी का बोलत नाहीस? आपण लग्न करू," असे म्हणत त्याने तिच्याशी वाद घातला. मात्र, तरुणीने लग्न करण्यास नकार दिला. त्यामुळे संतप्त झालेल्या आरोपीने तिला खाली पाडले आणि तिच्या छातीवर, पाठीवर तसेच हातावर धारदार चाकूने वार केले.

अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात खळबळ उडाली. हल्ल्यानंतर आरोपीने स्वतः उंदीर मारण्याचे औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. दोघांनाही उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी हिंजवडी पोलीस अधिक तपास करीत असून, फौजदार ताकतोडे तपास करीत आहेत.

# सेवा विकास पतसंस्थेचा ठेवीदारांना दिलासा;63,259 ठेवीदारांच्या ठेवी परत

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पूर्वीची दि सेवा विकास सहकारी बँक लि., पिंपरी-पुणे (अवसायनात) व सध्याची दि सेवा विकास सहकारी पतसंस्था मर्यादित, पुणे या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार, दि. 30 सप्टेंबर 2026 रोजी पिंपळे सौदागर येथील गोविंद गार्डन हॉल येथे उत्साहात पार पडली. संस्थेचे प्रशासक मा. डी. एन. काळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेस सभासद, ठेवीदार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.**




सभेच्या प्रारंभी प्रशासक डी. एन. काळे यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत करून संस्थेच्या आतापर्यंतच्या कामकाजाचा आढावा सादर केला. एकूण 63,259 ठेवीदारांना त्यांच्या ठेवींची रक्कम परत करण्यात आली असल्याची माहिती त्यांनी दिली.सध्या 192 ठेवीदारांची प्रकरणे प्रलंबित असून, त्यापैकी काही ठेवीदारांची KYC प्रक्रिया पूर्ण झालेली नाही, तर काही ठेवीदार मयत असून त्यांच्या वारसांची नोंद झालेली नाही. संबंधित ठेवीदारांच्या नातेवाईकांनी संस्थेशी संपर्क साधून आवश्यक KYC व वारस नोंद प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन प्रशासक डी. एन. काळे यांनी केले.

यावेळी प्रशासक डी. एन. काळे यांनी नगरसेवक संदीप वाघेरे यांच्या सहकार्याचा विशेष उल्लेख केला. बँकेच्या अडचणीच्या

काळात तसेच ठेवीदार व सभासदांच्या प्रश्नांबाबत संदीप वाघेरे यांनी संस्थेला मोठ्या प्रमाणावर सहकार्य केले असून, विविध स्तरांवर आवश्यक ते सहकार्य व पाठबळ दिल्यामुळे अनेक कामांना गती मिळण्यास मदत झाली, असे काळे यांनी सांगितले.

"संदीप वाघेरे यांनी संस्थेच्या अडचणीच्या काळात सातत्याने सहकार्याची भूमिका ठेवली. ठेवीदारांच्या प्रश्नांबाबत सकारात्मक भूमिका घेत त्यांनी संस्थेला मोठ्या प्रमाणावर सहकार्य केले. त्यांच्या सहकार्याबद्दल संस्थेच्या वतीने आम्ही त्यांचे आभार मानतो," असे प्रशासक डी. एन. काळे यांनी नमूद केले.सभेमध्ये पूर्वीची दि सेवा विकास सहकारी बँक लि., पिंपरी-पुणे (अवसायनात)

यांच्या दि. 1 एप्रिल 2025 ते 3 डिसेंबर 2025 या कालावधीतील तसेच दि सेवा विकास सहकारी पतसंस्था मर्यादित, पुणे यांच्या दि. 4 डिसेंबर 2025 ते 31 मार्च 2026 या कालावधीतील वैधानिक लेखापरीक्षण अहवालास मान्यता देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. तसेच दि. 1 एप्रिल 2026 ते 31 मार्च 2027 या कालावधीसाठी लेखापरीक्षक नियुक्त करण्यासही सभेने मंजुरी दिली.बँकेच्या कर्मचाऱ्यांना नुकसानभरपाई म्हणून रु. 13,20,47,458/- इतकी रक्कम देण्याची तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी रु. 10,97,40,206.50/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे. ज्या कर्मचाऱ्यांनी अद्याप नुकसानभरपाईची रक्कम घेतलेली नाही, त्यांनी आवश्यक अर्ज व KYC कागदपत्रे संस्थेत जमा करून आपली रक्कम प्राप्त करून घ्यावी, असे आवाहन प्रशासक डी. एन. काळे यांनी केले.

सभेदरम्यान प्रशासक डी. एन. काळे यांनी नवीन पतसंस्थेमध्ये ठेवी ठेवणे, बचत खाती उघडणे आणि सभासदत्व घेण्याचे आवाहन केले. या आवाहनाला सभासदांनी सकारात्मक प्रतिसाद देत संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले. विविध सभासदांनी मिळून रु. 51 लाखांच्या ठेवी ठेवण्याचे मान्य करत संस्थेवरील विश्वास व्यक्त केला.

यावेळी नगरसेवक संदीप वाघेरे यांनी संस्थेच्या पुढील वाटचालीसाठी सभासद व ठेवीदारांनी सकारात्मक सहकार्य करण्याचे आवाहन केले. "अनेक ठेवीदारांच्या आयुष्यभराच्या कष्टाची पुंजी या संस्थेशी जोडलेली आहे. त्यामुळे ठेवीदारांच्या हिताला प्राधान्य देत पारदर्शक पद्धतीने कामकाज पुढे नेणे आवश्यक आहे. मोठ्या संख्येने ठेवीदारांना रक्कम परत मिळाली असून उर्वरित प्रकरणांमध्येही आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून प्रक्रिया पूर्ण व्हावी, अशी अपेक्षा आहे. नव्या पतसंस्थेवर सभासदांनी दाखविलेला विश्वास ही सकारात्मक बाब असून हा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे," असे मत वाघेरे यांनी व्यक्त केले.

शेवटी प्रशासक डी. एन. काळे यांनी उपस्थित सभासद, ठेवीदार व मान्यवरांचे आभार मानून सभेची सांगता केली.यावेळी प्रशासक डी. एन. काळे,नगरसेवक संदीप वाघेरे, सामाजिक कार्यकर्ते हरी कटारिया, शेखर अहिरराव, विजय कोटवाणी, प्रकाश मसंद,राजेश रामनाणी प्रवीण ढमाळ,बाळासाहेब रोकडे,प्रवीण वडमारे,वीरेंद्र यादव यांच्यासह सभासद व ठेवीदार, महिला सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिंपरी-चिंचवडच्या प्रिथिका प्रदीपची ऐतिहासिक कामगिरी

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : एची-नागोया एशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय महिला कंपाऊंड धनुर्विद्या संघाने दमदार कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. अंतिम सामन्यात भारताने बलाढ्य चीन संघाचा 238-234 अशा गुणांनी पराभव करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. या ऐतिहासिक विजयात पिंपरी-चिंचवडची कन्या प्रिथिका प्रदीप हिने महत्त्वपूर्ण योगदान देत शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.**




भारतीय महिला संघात प्रिथिका प्रदीप, ज्योती सुरेखा वेन्नम आणि चिकिता तनीपार्थी यांचा समावेश होता. अंतिम सामन्यात भारतीय संघाने सुरुवातीपासूनच अचूक निशाणेबाजीचे प्रदर्शन करत चीनवर वर्चस्व राखले. भारताचा 238 गुणांचा अंतिम स्कोअर हा दक्षिण कोरियाने 2014 मध्ये नोंदवलेल्या जागतिक विक्रमाशी बरोबरी करणारा ठरला.उपांत्य फेरीत भारताने दक्षिण कोरियाचा 234-233 अशा अत्यंत चुरशीच्या लढतीत पराभव करून अंतिम फेरी गाठली होती.

त्यानंतर अंतिम सामन्यातही भारतीय महिला तिरंदाजांनी संयम आणि कौशल्याचे दर्शन घडवत सुवर्णपदकावर मोहोर उमटवली. विशेष म्हणजे, भारतीय महिला कंपाऊंड संघाने एशियाई क्रीडा स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक जिंकण्याची ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

ज्योती सुरेखा वेन्नम यांचे हे एशियाई क्रीडा स्पर्धेतील चौथे सुवर्णपदक ठरले, तर प्रिथिका प्रदीप आणि चिकिता तनीपार्थी यांनी आपल्या पहिल्याच एशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकण्याचा मान मिळवला.

**पिंपरी-चिंचवडसाठी अभिमानाचा क्षण..**

प्रिथिका प्रदीपच्या या यशामुळे पिंपरी-चिंचवड शहराचे नाव आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात अभिमानाने झळकले आहे. शहरातील पिंपरी-चिंचवड आर्चरी असोसिएशनच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून सुरु असलेल्या धनुर्विद्या विकासाच्या प्रयत्नांना या यशामुळे नवी दिशा आणि प्रेरणा मिळाली आहे.

पिंपरी-चिंचवडमधून घडलेली खेळाडू एशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करून सुवर्णपदक जिंकते, ही संपूर्ण शहरासाठी गौरवाची बाब मानली जात आहे. तिच्या या कामगिरीमुळे महाराष्ट्रासह देशभरातील युवा धनुर्धरकांना प्रेरणा मिळणार आहे.

प्रिथिकाच्या यशामागे प्रशिक्षक कुणाल टावरे यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, तांत्रिक प्रशिक्षण आणि मेहनत महत्त्वाची ठरली आहे. तसेच तिच्या पालकांनी दिलेला पाठिंबा, विश्वास आणि प्रोत्साहन हेही तिच्या यशाचे प्रमुख आधारस्तंभ मानले जात आहेत.

**सोनल बुंदेले यांची प्रतिक्रिया..**

महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेच्या सहसचिव तथा पिंपरी-चिंचवड आर्चरी असोसिएशनच्या सचिव सोनल बुंदेले यांनी प्रिथिकाच्या यशाबद्दल आनंद व्यक्त करत सांगितले की, "प्रिथिकाची गुणवत्ता आणि तिच्यातील विशेष टॅलेंट शालेय वयात असतानाच ओळखण्याची संधी मला मिळाली होती. तिची जिद्द, मेहनत, शिकण्याची तयारी आणि खेळाप्रती असलेली निष्ठा आज एशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदकापर्यंत पोहोचली आहे, याचा अभिमान वाटतो. तिचे हे यश पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र आणि भारतासाठी गौरवाची बाब आहे. या यशामुळे अनेक युवा खेळाडूंना प्रेरणा मिळेल."

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968